## नियमित दिवाणी दावा क्र.४९/१९८६ मधील निशाणी १८८ वरील आदेश

१. अर्ज व म्हणणे वाचले.

२. अभिलेखातील कागदपत्रे पाहिली.

३. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला.

४. प्रतिवादी क्र.२ड यांचे अर्जातील कथनांप्रमाणे वादीने मा.ना.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचे रिट पिटीशन क्र.११५०/२०१९ मधील आदेशानुसार हा दावा दिनांक ०४.०२.२०२१ रोजी पुन्हा फैलावर घेतला आहे. त्यानंतर वादीने मयत प्रतिवादी क्र.२ चे वारस प्रतिवादी क्र.२अ ते २ई अभिलेखावर घेतले आहेत. वादीने दावा दुरुस्ती करून दावा कलम १क मध्ये नमूद केलेल्या मिळकती दाव्यामध्ये समाविष्ट केल्या आहेत. त्यासंबंधी दुरुस्त दावा समन्सची बजावणी प्रतिवादी क्र.२ड यांचेवर दिनांक ०४.०७.२०२४ रोजी झाली आहे. तथापि, प्रतिवादी क्र.२ड हे दाव्यात हजर झाले नाहीत. वादीने निशाणी १४३ वरील दावा दुरुस्तीच्या अर्जानुसार दिनांक २०.११.२०२५ रोजी दावा दुरुस्त प्रत दिली आहे. ती प्रत प्रतिवादी क्र.२अ ते २ई यांना दिली गेली नाही. प्रतिवादी क्र.२ड यांनी न्यायालयात येवून दावा पाहिला असता दिनांक २०.१२.२०२५ रोजी जादा मुद्दे काढल्याचे दिसून आले. प्रतिवादी क्र.२ड यांना दावा कलम १क मधील त्यांचे हितसंबंधांचे संरक्षण करणेसाठी याकामी हजर होवून कैफियत देणे आवश्यक आहे. त्यामुळे, त्यांचेविरुध्द दिनांक ०३.१०.२०२४ रोजी झालेला एकतर्फा आदेश रद्द करणेत यावा व त्यांना याकामी हजर होणेस व कैफियत सादर करणेस परवानगी मिळावी, अशी विनंती प्रतिवादी क्र.२ड यांनी केली आहे. वादी यांनी अर्जास हरकत घेतली आहे. परंतु, प्रतिवादी क्र.२ड यांनी अर्जाचे पुष्ट्यर्थ शपथपत्र सादर करून अर्जातील कथने शपथेवर कथन केली आहेत. त्यामुळे, प्रतिवादी क्र.२ड यांनी अर्जात

नमूद केलेले कारण संयुक्तिक वाटते. वादी यांनी रे.दि.मु.नं.४७/१९५८ मधील हुकूमनामा नलिटी असल्याचे जाहीर होवून मिळणेसाठी व वाटपासाठी हा दावा दाखल केला आहे. त्यामुळे, दाव्याचे स्वरुप पाहता प्रतिवादी क्र.२ड यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणेसाठी त्यांना याकामी हजर होणेस व कैफियत सादर करणेस परवानगी देणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक व जरुरीचे आहे. परंतु, प्रतिवादी क्र.२ड यांचेकडून झालेला विलंब पाहता त्यांना रक्कम रु.३००/– (रुपये तीनशे मात्र) इतकी कॉस्ट होणे व ती कॉस्ट वादी यांना अदा करणे तितकेच आवश्यक आहे. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहेः–

**आ दे श**

**१.** प्रतिवादी क्र.२ड यांचा हा अर्ज त्यांनी वादी यांना रक्कम रु.३००/– (रुपये तीनशे मात्र) इतकी कॉस्ट देण्याच्या अटीवर मंजूर करणेत येत आहे.

**२.** प्रतिवादी क्र.२ड यांचेविरुध्द दिनांक २०.०४.२०२३ व ०३.१०.२०२४ रोजी झालेले एकतर्फा आदेश रद्द करणेत येत आहेत.

–

DHIRAJ MARUTI HINGLAJKAR

Digitally signed by DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Date: 2026.01.03 17:55:37 +0530

**दिनांक : ०३.०१.२०२६**
**ठिकाण : अकोले**

**(डी.एम.हिंग्लजकर)**
**दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अकोले,**
**ता.अकोले, जि.अहमदनगर.**

**Certificate**

I affirm that the contents of this PDF file are word to word as per original judgment/order.

Sd/-
(Amol U. Salpe)
Stenographer (Grade-3)
Civil Court Junior Division
Akole.

| | | |
|---|---|---|
| Dictated on | : | 03.01.2026 |
| Transcribed on | : | 03.01.2026 |
| Checked and signed on | : | 03.01.2026 |